RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

## UGC-CARE LISTED



**RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT**

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal
UGC CARE LISTED JOURNAL
February – 2020

## Rethinking Mahatma Gandhi in Present Context

Executive Editor
Dr. Kiran Save
Principal
Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar Dist. Palghar [M.S.] India

Co-Editors
Dr. Tanaji Pol
Asst. Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi
Pratik Prakashan, Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur
Dist. Latur- 433515, Maharashtra

Published by – Dr. Kiran Save, Principal,Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.

© all rights reserved with the Editors

# Index



| अ.क्र. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या धर्मविषयक विचारांची प्रस्तुतता | श्री. संतोष बुधाजी भावार्थे | १.५ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व | डॉ. किरण जयदेव सावे | ६.११ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्भगवद्गीता | डॉ. सचिन खोकले | १२.१४ |
| ४ | अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. विनोद संभाजी सोनवणे | १५.२१ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २२.२८ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | २९.३४ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ३५.३९ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रांसंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ४०.४४ |
| ९ | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ४५.४८ |
| १० | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्या 'सत्याग्रह' तत्वज्ञानाचे महत्व | प्रा. प्रेरणा राऊत | ४९.५२ |
| ११ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडे | ५३.५६ |
| १२ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ५७.५९ |
| १३ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ६०.६३ |
| १४ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाउराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ६४.६६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | महात्मा गांधीजीची आदर्श ग्रामाची संकल्पना | डॉ. प्रमोद रामेश्वर चव्हाण | ६७.६९ |
| १६ | गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. नाना झगडे, | ७०.८१ |
| १७ | 'सद्य परिस्थितीत महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता' | प्रा. डॉ. वसंत आबासाहेब खरात, | ८२.८७ |
| १८ | महात्मा गांधीजींच्या स्वराज्य संकल्पनेचे एक साधन–सहकार मार्गदर्शक | डॉ. अनिल पाटील<br>योगिनी जयवंत पाटील | ८८.९३ |
| १९ | ''सिनेमा आणि गांधी'' | शशिकांत एस माघाडे | ९४.९९ |
| २० | सिनेमातील गांधी | प्रा. सुजाता बळवंत शिरोडे | १००.१०४ |
| २१ | 'मराठी साहित्यातील गांधीवाद' | प्रा. यादव धोंडूजी मोरे | १०५.१०९ |
| २२ | महात्मा गांधीजींची सत्याग्रह संकल्पना | प्रा. वितेश भारत निकते | ११०.११२ |
| २३ | महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार | प्रा. डॉ. जे. के. पाटील | ११३.११९ |
| २४ | ''गांधीजीके ट्रस्टीशिप सिद्धांत का अन्वयार्थ'' | श्री. अमन बगाडे | १२०.१२४ |
| २५ | महात्मा गांधीजीकी स्वदेशी विचारधारा | प्रा. दिप्ती हरेश म्हात्रे | १२५.१२७ |
| २६ | २१वीं सदी में गांधीवाद की उपयोगिता | डॉ. संगीता ठाकुर | १२८.१३१ |
| २७ | महात्मा गांधी – राष्ट्रीय नेता | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | १३२.१३७ |
| २८ | ग्रामगीता व गांधीविचार | डॉ. शर्मिला वीरकर | १३८.१४५ |
| २९ | महात्मा गांधी यांचे अस्पृश्यताविषयक विचार | डॉ. सखाराम डाखोरे | १४६.१५२ |
| ३० | महात्मा गांधी आणि धर्म | डॉ. विन्सेन्ट कैतान डिमेलो | १५३.१६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनेजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये–देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले – पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य–साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोभले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गांधी – एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | महात्मा गांधी: लोकशाही हा जीवनमार्ग | ऋतुजा राऊत | २५३.२५७ |
| ४६ | गांधीजींचे पर्यावरणवादी विचार | सोनाली महादेव पवार | २५८.२६७ |
| ४७ | गांधीजी आणि पर्यावरण | मनिषा नागुराव कामजी<br>ऐश्वरी शिवाजी खामकर | २६८.२७१ |
| ४८ | पर्यावरण विचार आणि गांधी | आर्यन एनेश नेरुरकर | २७२.२७८ |
| ४९ | गांधी ते महात्मा गांधींचा प्रवास | तनिका कल्याणकर | २७९.२८४ |
| ५० | गाँधी जी के टिप्पणी और विचार | फिरोज अलिम अली | २८५.२९० |
| ५१ | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | प्रा. कु. सोनाली सुरेश पेकम | २९१.२९३ |
| ५२ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार – काळाची गरज | डॉ. बी. एच. दामजी<br>डॉ. ए. व्ही. नामा | २९४.३०० |
| ५३ | महात्मा गांधी यांच्या दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण | डॉ. रमिला गायकवाड | ३०१.३०७ |
| ५४ | महात्मा गांधीच्या अहिंसा तत्त्वाची सद्यकालीन प्रासंगिकता | प्रा. धनराज सुभाष हाडुळे | ३०८.३१४ |
| ५५ | महात्मा गांधीजींची धर्म स्वातंत्र्याची संकल्पना | डॉ. बाळासाहेब मुळीक | ३१५.३२३ |
| ५६ | गांधीवाद आणि मराठी कविता | प्रा. विवेक वसंत कुडू | ३२४.३२९ |
| ५७ | २१ व्या शतकात 'सर्वोदय' विचारसरणीचे महत्त्व | प्रा. संध्या देवदत्त शिरोडकर | ३३०.३३४ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# गांधीवाद आणि मराठी कविता

**सहायक प्रा. विवेक वसंत कुडू**
सोनोपंत दांडेकर कला,
वा. श्री. आपटे वाणिज्य आणि
एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय. पालघर.

**प्रस्तावना :**

साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. साहित्याचा निर्माता माणूस असल्याने माणसा सभोवती घडणाऱ्या सर्व घटनांचे पडसाद साहित्यात उमटणे अपरिहार्य आहे. साहित्यिक समाजातल्या विविध विचारधारांचा तो स्वीकार करतो वा नकार देतो अथवा त्याची स्वत:ची विचारधारा निर्माण करतो. संशोधन शीर्षकात 'मराठी कवितेतील महात्मा गांधी' असे असल्याने महात्मा गांधी यांचे विचार, त्याच्याशी संबंधीत महत्त्वाच्या घटना, त्यांचे सत्याचे प्रयोग, त्यांचे भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील विविध आंदोलने, त्यांच्या विचारसरणीतून आकारास आलेला गांधीवाद या सर्वांचा मराठी कवितेवर काय प्रभाव पडला का, याचा विचार प्रस्तुत निबंधात करायचा आहे. गांधीजीच्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्द सुरु असताना झालेले कविता लेखन, त्यांची हत्या झाल्यानंतर लिहिलेल्या कविता आणि तद्नंतर आजतागायत महात्मा गांधी यांच्यावर लिहिलेल्या कविता असा कवितांचा विचार करावा लागेल.

महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रगण्य नाव. त्यांनी आपल्या जगण्यातून आदर्श जगाला घालून दिला. अहिंसा हे एक मौलिक तत्त्व जगाला दिलं. ग्रामोद्धार, अंत्योदय, विश्वस्त संकल्पना, सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ब्रम्हचर्य, शरीरश्रम, स्वदेशी, जीभेवरील नियंत्रण, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता न मानने हे ही मूल्ये समाजाला दिली. गांधीजींच्या विचारात पुरोगामीपणा होता. स्त्रीला निर्भय व्हायला सांगितले. त्यांच्या विचारांकडे वरवर ज्यांनी पाहिले त्यांना गांधीजी प्रतिगामी वाटले. अखिल मानवाला कल्याणप्रद जीवन प्राप्त व्हावे हा त्यांचा उदात्त हेतू होता. गांधीजींच्या या महत कार्याचा जगभरातील अनेक समाजकारणी यांच्यावर प्रभाव पडला अनेक महनीय व्यक्तींनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

१९२० ते १९५० हे गांधी युग म्हणून ओळखले जाते. गांधीवाद म्हणजे गांधीजींची विचारसरणी होय. गांधीवादा बाबत दत्तात्रेय पुंडे असे म्हणतात. 'स्थूलमानाने म्हणायचे झाले तर गांधीवाद हा मुळात जीवनतत्व वाद आहे तो समाजाच्या सर्व अंगांना एकसंघ परस्परपूरक परस्पर पोषक आणि परस्पर आश्रय मानणारा आहे गांधीवाद मानुष ते विमानुष जीवनाचा मानवाच्या भौतिक आणि मुख्यत्वेकरून अध्यात्मिक जीवनाचा साम आणि एक तत्त्वाच्या पायाभूत भूमिकेवरून विचार करणारा वाद असल्याने त्याला एका आधुनिक भारतीय दर्शनाचे रूप प्राप्त झाले आहे.'[१]

गांधी आणि गांधीवादाचा महाराष्ट्रातील साहित्यिकांवर याचा काय परिणाम झाला असा जर विचार केला तर फारसे सकारात्मक चित्र दिसत नाही. १९२० ते १९४० या काळात गांधीवाद अतिशय कृतिशील होता. मराठी साहित्याने त्याचा स्वीकार केला नाही. असे विधान दत्तात्रेय पुंडे यांनी केले आहे. कारण या काळात महाराष्ट्रातल्या बुद्धिजीवी वर्गात ध्येयवाद मागे पडून व्यवहारवाद पुढे आला होता. तसेच मार्क्सवाद आणि वास्तववाद यांची ही निर्मिती झाली होती त्यामुळे गांधीवादास थारा मिळाला नाही. लेखक रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ यांच्या मते 'गांधींच्या जीवन—कार्याचा मराठी जनमानसावर अतिशय खोल व व्यापक परिणाम झाला. त्यांच्या चळवळीत तनमनधन झोकून देणारे लाखो कार्यकर्ते महाराष्ट्रात निर्माण झाले. रचनात्मक कार्याच्या बाबतीत तर 'महाराष्ट्र ही कार्यकर्त्यांची खाण आहे' असे खुद्द गांधीजी म्हणाले होते. गांधीविचारांचे साक्षेपी विवेचन करणारे पहिल्या पिढीतील स्वतंत्र विचारकही ह्या भूमीत जन्मले. असे असले तरी महाराष्ट्राच्या प्रस्थापित साहित्यिक परंपरेने गांधींना कधीही आपले मानले नाही. त्यांचा विरोधच नव्हे, तर त्यांची कुचेष्टा व निंदा करण्यात मराठी साहित्यिकांनी आणि येथील तथाकथित बुद्धिमंतांनी धन्यता मानली. आजही गांधीजींवर कमरेखालचे वार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे.'[२] डॉ. दिलीप बिरुटे यांच्या मतानुसार 'मराठी कादंबरी आणि मराठी कविता यावर गांधीवादाचा फार थोडा प्रभाव दिसतो. नाट्यक्षेत्रात तो प्रभाव नगण्यच असावा. एकुण काय मराठी साहित्याने गांधीवादाचा पुरस्कार जरा हात राखून केलेला दिसतो असे म्हणन्यास हरकत नसावी.'[३]

कविता आत्म्याचा आविष्कार असतो. कवी आपल्याला अनुभवास आलेल्या अनेक नोंदी तो कवितेद्वारे करीत असतो. महात्मा गांधी यांचा सर्जनाच्या बाबतीतला विचार आणि कवितेचे सर्जन याबाबत साम्य आढळते. मराठी भावकवितेने दिलेली गांधीजींना मानवंदना त्यांच्या व्यक्तित्वाचा फार छोटे रूपाचे दर्शन घडविते. मराठी कवितेत महात्मा गांधी यांचे दर्शन घडते. काही कवितांमध्ये प्रत्यक्ष प्रतिबिंब तर काही कवितांमध्ये अप्रत्यक्ष प्रतिबिंब दिसून येते. भा. रा. तांबे यांनी गांधीविचाराने प्रभावित होऊन काही कविता लिहिल्या जशा की 'रुद्रास आवाहन' ही त्यांची जलियनवाला बाग हत्याकांडाची

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

धिक्कार करणारी कविता. तर 'गाडी बदलली' या कवितेतुन अहिंसा तत्त्वज्ञानाचा पुरस्कारच केला आहे. 'कोण रोधील' या कवितेतून तांबे यांनी गांधीजींना आणि त्यांच्या अनुयायांना राष्ट्रनिर्माते म्हटलेले आहे.

कवी कुंजबिहारी यांची –

'भेटेन नऊ महिन्यांनी'
मनी धीर धरी शोक आवरी जननी भेटेन नऊ महिन्यांनी
या न्यायाची रीत मानवी नसते
खरी ठरते केव्हा चुकते...ही कविता खूपच गाजली होती.

माधव ज्युलीयन, यशवंत यांच्याही कवितेतून राष्ट्रीय वृत्ती आणि अहिंसेचा पुरस्कारच त्यांच्या विचारातूनच येतांना दिसतो. विठ्ठलराव घाटेंची ''तो पाहा महात्मा आला'' गांधीजींच्या दांडीयात्रेवरही काही कविता लिहिल्या. आनंदराव टेकाडे यांची 'रणसंग्राम' विशेष मानली जाते. माधव ज्युलीयन यांनी 'महात्मा गांधी आणि टागोर' 'महात्मा काय करील एकटा' या सारख्या कविता लिहिल्या.

साने गुरुजीं बाबत वसंत आबाजी डहाके असे म्हणतात, 'साने गुरुजी यांच्या सत्याग्रही काव्यावर गांधींची विचारधारा आणि नेहरुंचा युक्तिवाद या दोघांचाही प्रभाव आहे.[४] साने गुरुजी यांची कविता गांधी विचारांनी प्रभावित झालेली आहे. पत्री मधील गांधीस्तवनात आईला उद्देशून तो मुलगा म्हणतो,

''माते रात्रंदिन तळमळे एक थोर गांधी महात्मा/भूमातेची बघून विपदा तो जळे अंतरात्मा//वार्धक्यहि अनुपम तपे पेटवी राष्ट्र सर्व/कष्टे मोठ्या भरतभुवनी आणि ती मोक्षपर्व किंवा महात्मा गांधी हे थोर दुःखार्त जन–तारक/मरतात जनांसाठी म्हणून होती नायक. महात्मा गांधीजींचे नायकत्व त्यांना भावलं होते. सांध्यप्रार्थना', 'हरी आला रे' अशा काही स्फुट भावकवितातून बा.भ. बोरकरांनी गांधीजी बद्दलची आपली भाववृत्ती प्रकट केली आहे.

ती मूर्ती गोजिरी, ज्योती कर्पुरगौर/ऋत, शांति, अहिंसादलित–स्फूर्ती गंभीर/
गंगेपरि गेली पद्धुनी संथ गतीने/निशब्द प्रीतीने जीववुनि दोन्ही तीर...

बोरकर मराठी कवितेच्या रोमँटिक प्रकृती धर्मानुसार गांधीजींच्या महात्मा ते चे दर्शन घडवितात. बा. भ. बोरकरांच्या 'मज लोभस हा इहलोक हवा' या कवितेत मार्क्सचा मज अर्थ हवा अन फ्रॉईडचा मज काम हवा/या असुरां परी राबविण्या घरी गांधींचा मज राम हवा... असे भाव व्यक्त झाले आहेत. बा. भ. बोरकरांचे 'महात्मायन' असे प्रदीर्घ महाकाव्य लिहिण्याचा संकल्प पूर्ण झाला नाही. वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या 'विशाखा' व 'किनारा' या कवितासंग्रहात गांधींच्या मूल्यांची काही

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce &
M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

चिन्हे काही कवितांमध्ये दिसतात. गांधीजींच्या संदर्भात ते म्हणतात 'गांधी आपल्या मनांच्या मनांच्या अथवा देहाच्या रुपाने उरले आहेत असे वाटतच नव्हतं युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी श्रीकृष्णाने प्रार्थना विश्वरूप दर्शन घडविले त्या प्रमाणे भारताचा सर्व नकाशा व्यापून टाकणारा आत्मिक शक्ती चा एक अदृश्य पूर्व उद्रेक गांधींच्या ठिकाणी आम्हाला दिसत होता.''प्रवासी पक्षी' या संपादित कविता संग्रहात 'अखेर कमाई' या शीर्षकाची कविता आहे.

जोतिबा म्हणाले, शेवटी मी झालो फक्त मावळ्यांचा
शिवाजीराजे म्हणाले, मी फक्त मराठ्यांचा
आंबेडकर म्हणाले, मी फक्त बौद्धांचा
टिळक उद्गारले, मी तर फक्त चित्पावन ब्राह्मणांचा
गांधीजींनी गळ्यातला गहिवर आवरला
आणि ते म्हणाले, तरी तुम्ही भाग्यवान
एकेक जमात तरी तुमच्या पाठीशी आहे
माझ्या पाठीशी मात्र फक्त सरकारी कचेऱ्यातल्या भिंती!!

महाराष्ट्रात अनेक सुधारक होऊन गेले या विचारवंताना वेगवेगळ्या जाती समूहांनी वाटून घेतले आहे. त्यांचा विविध कारणासाठी वापर करून घेतला जातो. मानव जातीसाठी भव्यदिव्य करूनही त्यांच्या वाट्याला असे केवळ पुतळेपण आले.

या कवितेवर विचारवंत विश्वंभर चौधरी यांनी एका लेखात भाष्य केले आहे. कवी कुसुमाग्रजांची ही कविता कमी शब्दांत किती मोठं वास्तव सांगून जाते! दरवर्षी २ ऑक्टोबर गांधी जयंतीच्या दिवशी गांधीजींच्या स्मरणासोबत या कवितेचंही स्मरण होणं अटळ आहे. राष्ट्रपित्याला आपण आपल्या देशात पोरकं करून ठेवलंय, ही भावना मनातून हटत नाही. राष्ट्रपित्याचं हे पोरकेपण तीन आघाड्यांवरचं आहे – सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक अशा त्या तीन आघाड्या "

बा. सी. मर्ढेकर यांना असाच महात्मा जन्मास यावा असे वाटते.

''अशीच जावी काही वर्षे
आणि महात्मा यावा पुढचा
आम्हांस आम्ही पुन्हा पहावे
काढून चष्मा डोळ्यांवरचा''

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

'ज्वाला आणि फुले' ही कविता बाबा आमटें यांची. त्यांच्यातील वैचारिक झापडे नाकारणारा कार्यकर्ता कवी म्हणतो –
गांधी माहात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाही/ आणि उद्याच्या पिढ्यांना त्याची ओळख पटण्यासाठी क्वचित कॉम्प्युटर लागेल!/ पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा... गांधीजींना त्यांनी काळाच्या भाळावर उमटलेली तप्त युगमुद्रा असे म्हटले आहे. विंदा करंदीकरांनी गांधीहत्येनंतर आलेल्या कमालीच्या अस्वस्थतेतून कविता लिहिली आहे. करंदीकरांच्या धोंड्या न्हावी या कवितेत खेड्यापाड्यात गांधीजी बद्दल असलेली भावना प्रकट होते, तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' गांधीजींचा विचार काव्य रुपात जनसामान्यांच्या पर्यंत पोहचविते. वसंत गुर्जरांची 'मला गांधी भेटला' याही कविता गांधीजींचे अल्प दर्शन घडवितात.

१९३० ते १९४० या काळात गांधी यांची थोरवी व स्वातंत्र्य आंदोलनाची माहिती गाणारे अनेक कवी निर्माण झाले, मात्र भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि त्यांच्या काव्यकृतीही नष्ट झाल्या. कारण त्यांच्या काव्यात मूलभूत काव्यगुणच नव्हते असे म्हटल्या जाते त्याच बरोबर अनेक कवी, लेखकांना त्यांचे तत्वज्ञान मान्य नव्हते पण त्यांचा मोठेपण मान्य होते. स्वातंत्र्य लढ्याचे एक निर्भीड सेनानी म्हणून त्यांच्याविषयीचा तो आदर होता, तोच आदर कविता, कादंबऱ्यातून व्यक्त झाला आहे. आजही कवितेतून बऱ्याचदा गांधीजींवर कविता लिहिणारी कवी मंडळी दिसते. पण लिहिते ते उपाहासातून... टीका करण्याच्या उद्देशातून किंवा खरेच बापू तुमच्या विचारांची गरज आहे असाही एक विचार कवितेत दिसतो ' बापु तुमच्या देशात, बापू, महात्मा, अशा शीर्षकाच्या अनेक कविता दिसतात कधी त्यांच्यावर टीका तर कधी त्यांच्या विचारांचे मोठेपण दाखविल्या जाते. 'आज अहिंसेचा रस्ता/बापू हिंसेतून जात आहे/म्हणून बापू सारा देश/तुमची वाट पाहत आहे.' यू ट्यूब वरील कविता महत्वाची आहे.

कवितेत गांधी आणि गांधीवादाचा प्रभाव फारसा पडलेला आपल्याला दिसत नाही. जोपर्यंत गांधी युग होते तोपर्यंत त्यांचे व्यक्तिमत्व त्यांचे महात्म्य यासारख्या विषयांवर गौरवपर, रोमँटिक वृत्तीतून, आदर भावाने कविता लिहिल्या गेल्या आहेत. मराठी कवितेत गांधीजींच्या प्रभावात असलेला कवी दिसत नाही. आज गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करणारे अभ्यासक गांधीवादाची आवश्यकता विषद करीत असले तरी गांधीजींवर अथवा त्यांच्या विचारसरणीला धरून कोणी कविता लिहिताना दिसत नाही. एखाद्या कवितेमध्ये अस्पष्टसा उल्लेख येऊन जातो. मुळात कविने अशी प्रयोजनमूलक कविता लिहावी ही अपेक्षा करणे चुकीचे आहे.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

## संदर्भ :

१. पुंडे दत्तात्रेय, संपादक गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९५, पृष्ठ क्रमांक २०३.
२. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ https://m.dailyhunt.in/news/india/marathi/aksharnama-epaper-aksharna/gandhivichar+aani+marathi+sahity-newd-102916447 संकेत स्थळास भेट १२.१२.२०२०
३. बिरुटे दिलीप, गांधीवाद आणि मराठी साहित्य, १८ डिसेंबर २००८ https://www.misalpav.com/node/5157 संकेतस्थळ भेट . २.१.२०२१
४. डहाके वसंत आबाजी, कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ८५
५. विश्वंभर चौधरी, https://divyama,rathi.bhaskar.com/news/MAG-dr-5131345-NOR.html
६. https://www.youtube.com/watch?v=0uRE0C0DdQg

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal
RNI: MAHMAR 36829-2010
ISSN : 2229-4929
Rethinking Mahatma Gandhi in Present Context February – 2020

Published by – Dr. Kiran Save, Principal,Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar
The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.
© all rights reserved with the Editors.

UGCCARE Listed Journal Akshar Wangmay